प्रेस नोट दि.२३/०८/२०१८

**भिक मागण्यासाठी पुणे रेल्वे स्टेशन येथुन चार महिन्यांचे मुल पळवुन नेणाऱ्या महिलेस बालकासह मुंबई पोलीसांच्या मदतीने स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे यांनी मुंबईमधुन केले जेरबंद**

फिर्यादी नामे संगिता आनंद कंग ,वय.२५ वर्षे धंदा.मजुरी रा.कोपार्डे ,ता.करविर ,जि.कोल्हापुर यांचा चार महिन्याचा मुलगा नामे प्रमोद याचेसह दि.१७.०८.२०१८ रोजी रात्री.०८.१५ ते १२.०० वा.सुमारास पुणे रेल्वे स्टेशन प्लॉट नं.२ वर बुक स्टॉलजवळ झोपले असता त्यांच्या झोपेचा फायदा घेवुन दोन अनोळखी महिलांनी त्यांच्या मुलास अज्ञात कारणासाठी अज्ञात ठिकाणी पळवुन नेलेबाबत तक्रार दिल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा दाखल झालेपासुन स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी अहोरात्र पुणे रेल्वे स्टेशन परिसर ,पुणे शहर ,दत्त मंदीर ,दगडुशेठ गणपती मंदीर परिसर ,तांबडी जोगेश्वरी मंदीर परिसर ,महात्मा फुले मंडई परिसर ,दर्गा परिसर या भागामधील भिक मागणाऱ्यांकडे करुन तपास केला.स्थानिक गुन्हे शाखेच्या खबरी मार्फत खात्रीशिर माहिती मिळाली की पुणे रेल्वे स्टेशन येथुन लहान मुलास पळवणारी महिला त्या बाळासह जोगेश्वरी येथील माझेसमोर ब्रिजखाली भिक मागत आहे.अशी माहिती मिळाल्यावर खबरीस स्थानिक पोलीसांच्या मदत घेणेबाबत कळवुन त्याठिकाणी बंदोबस्तावर असणारे अंबोली पो.हवा.शिर्के म.पो.कॉ.पुरी यांना फोनवरुन संपर्क करुन त्या संशयीत महिलेस बाळासह ताब्यात घेण्यास सांगितले.त्याप्रमाणे पो.हवा.शिर्के व म.पो.कॉ.पुरी यांनी सदर महिलेस बाळासह ताब्यात घेवुन ओशिवरा पोलीस ठाणेत हजर केले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.अनिल दबडे यांनी लागलीच एक पथक फिर्यादी महिलेसह मुंबई येथे रवाना केले. सदर पथकाने ओशिवरा पोलीस ठाणे येथे जावुन आरोपी महिला नामे मनीषा महेश काळे ,वय.२५ वर्षे ,धंदा.भिक मागणे ,रा.सध्या .हडपसर रेल्वे स्टेशन जवळील झोपडपटटी ,जि.पुणे मुळ गाव .मु.पो.भुतकर वाडी ,भिंगार देवमळा ,जि.अहमदनगर हिची व पळवुन नेलेल्या बाळाची फिर्यादी महिलेकडुन खात्री करुन त्यांना ताब्यात घेतले.आरोपी महिलेकडे तपास केला असता तीने लहान मुल कडेवर असल्यामुळे लोक जास्त भिक देतात त्यामुळे भिक मागायच्या उददेशाने फिर्यादी महिला झोपली असता तीच्या जवळील लहान मुलास झोपेचा फायदा घेवुन पळवुन नेल्याचे सांगितले. यातील आरोपी महिलेने आणखी गुन्हे केले आहेत का व साथीदारांबाबत तपास चालु आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.तुषार पाटील सो.व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.नंदकुमार घोरपडे यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.अनिल दबडे ,स.पो.निरी.मंगेश जगताप ,पोलीस कर्मचारी धनंजय दुगाने ,सुनील कदम ,श्रीकांत भोसले ,आनंद कांबळे ,अमरदिप साळुंके,अनिल दागट ,दिनेश बोरनारे ,जनार्दन गर्जे ,विक्रम मधे ,स्वप्नील कुंजीर ,निलेश बिडकर ,राजेश कोकाटे ,प्रभा बनसोडे ,अश्विनी येवले,मनीषा बेरड ,चालक सुधाकर जगताप व पो.नि.विजयकुमार रणजीत कुरील ,म.पो.शि.स्वरा साळकर ओशिवरा पो.ठाणे ,मुंबई शहर , पो.हवा.शिर्के ,म.पो.कॉ.पुरी अंबोली पो.ठाणे ,मुंबई यांनी केली आहे.

## मागील दोन महिन्यांमधील स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे लोहमार्ग पुणे यांची कामगिरी

..................................................................................................................

मा.पोलीस अधीक्षक श्री.तुषार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली मागील दोन महिन्यांमध्ये **स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे यांनी १४ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडुन ९,२१,९०० /-रु किमतीचा एकुण माल जप्त करण्यात आला असुन ११ गुन्हे उघडकीस आले आहेत.**पुणे लो.पो.ठाणे गु.र.नं.७०६/१०१८ ,भा.द.वि.क.३७९ या गुन्हयामध्ये रेकॉर्डवरील तीन आरोपींकडुन ४,७०,००० /-रु किमतीची सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.तसेच तीन वाहन चोरांकडुन २,००,००० /-रु किमतीच्या सहा दुचाकी गाडया जप्त करण्यात आल्या आहेत. दुचाकी चोरांकडुन पुणे रेल्वे स्टेशन ,लातुर ,लोणी व हडपसर पोलीस ठाणे येथील गुन्हे उघडकीस आले आहेत.कोपरगाव येथुन पुणे रेल्वे स्टेशन येथे येवुन प्रवाशांचे मोबाईल ,बॅग चोरणाऱ्या चार आरोपींना अटक करुन १,३९,००० /-रु किमतीचे १७ मोबाईल व ५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जप्त करण्यात आली आहे.

**उघडकीस आलेल्या गुन्हयांची माहिती**

**पुणे लो.पो.ठाणे गु.र.नं.७०६/२०१८ ,भा.द.वि.३७९ ,३४**

आरोपी :१) शाहरुख सलीम शेख ,वय.१९ वर्षे ,

२) हजरत बिलाल नवाज शेख ,वय.१९ वर्षे

३) रिषभ युवराज आल्हाट ,वय.२२ वर्षे ,सर्व रा.राजीव गांधीनगर झोपडपटटी,मेंटल कॉर्नर ,येरवडा

जप्त माल : ४,७०,००० /-रु किमतीची सोन्याचे दागिने,मोबाईल ,दोन घडयाळ , एक चार चाकी गाडी

**पुणे लो.पो.ठाणे गु.र.नं.३८२/२०१८ ,भा.द.वि.३७९**

आरोपी :१) रतन निशीकांत पवार ,वय.२१ वर्षे ,रा.वाघाची वाडी ,ता.कर्माळा ,जि.सोलापुर

जप्त माल : ७२,००० /-रु ,किमतीचा आय फोन व

कुर्डवाडी लो.पो.ठाणे **गु.र.नं.५३/२०१८ ,भा.द.वि.३७९,३५६** मधील

४५,००० /-रु ,किमतीचे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने

..................................................................................................................

आरोपी : १) विकी बबनराव लांडगे ,वय २१ वर्षे ,रा.मुकुंदवाडी ,संजय नगर , गल्ली नं.४ ,जि.औरंगाबाद ,सध्या पुणे फिरस्ता

२) राहुल राजु शिंदे ,वय.१९ वर्षे ,रा.साईबाबा कॉर्नर ,पेट्रोलपंपाजवळ ,कोपरगाव ,जि.अहमदनगर ,सध्या.पुणे फिरस्ता

३) अशोक बाबु लहाने ,वय.२२ वर्षे ,रा.शिंदेमळा ,सावेडी ,जि.अहमदनगर ,सध्या .पुणे फिरस्ता

४) दिपक भगवान खाजेकर ,वय.३० वर्षे ,रा.हारेगाव ,ता.श्रीरामपुर ,जि.अहमदनगर ,सध्या.पुणे फिरस्ता

हे कोपरगाव येथुन पुणे रेल्वे स्टेशन येथे येवुन चोऱ्या करणाऱ्या आरोपींकडुन उघडकीस आलेले गुन्हे :

**पुणे लो.पो.ठाणे गु.र.नं.८५७ /२०१८ ,भा.द.वि.३७९ ,३४ ,**

**पुणे लो.पो.ठाणे गु.र.नं.८५८ /२०१८ ,भा.द.वि.३७९ ,३४ ,**

**पुणे लो.पो.ठाणे गु.र.नं.५५६ /२०१८ ,भा.द.वि.३७९ ,३४**

जप्त माल : १,३९,००० /-रु किमतीचे ,१७ मोबाईल व ५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन

........................................................................................

आरोपी : विष्णु भाऊराव कुंडगिर ,वय.१९ वर्षे ,रा.मारुती मंदीराजवळ ,खेर्डा ,ता.उदगिर ,जि.लातुर .सध्या .पुणे फिरस्ता

उघडकीस आलेले गुन्हे : पुणे लो.पो.ठाणे :२३२/२०१८ , ७७६/२०१८ भा.द.वि.३७९

जप्त माल :१,२०,००० /-रु किमतीच्या ४ दुचाकी गाडया

........................................................................................

पुणे लो.पो.ठाणे : २३२/२०१८ ,भा.द.वि.क.३७९ ,३४

आरोपी नामे १)रोहित सुभाष अलकुंटे ,वय.२४ वर्षे ,रा.दयानंद कॉलेजच्या पाठीमागे ,खडगाव रोड ,वडार गल्ली ,लातुर सध्या .पुणे फिरस्ता

२) सुनील गणपत कांबळे ,वय.२५ वर्षे ,धंदा .मजुरी रा.कडलास ,ता.सांगोला ,जि.सोलापुर . सध्या .पुणे फिरस्ता

जप्त माल : ८०,००० /-रु किमतीच्या २ दुचाकी गाडया व एक मोबाईल

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.तुषार पाटील सो.यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.अनिल दबडे ,स.पो.निरी.मंगेश जगताप ,पोलीस कर्मचारी धनंजय दुगाने ,सुनील कदम ,श्रीकांत भोसले ,आनंद कांबळे ,अमरदिप साळुंके,संतोष चांदणे ,अनिल दांगट ,दिनेश बोरनारे ,जनार्दन गर्जे ,विक्रम मधे ,स्वप्नील कुंजीर ,निलेश बिडकर ,राजेश कोकाटे ,ज्ञानेश्वर सुर्यवंशी ,पवन बोराटे ,चालक सुधाकर जगताप ,जगदीश सावंत ,खोत यांनी केली आहे.